# आरोग्य सेवा संचालनालय
## (महाराष्ट्र राज्य)

"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलोरोड, मुंबई- ४०० ००१

| कार्यालय संचालक (वैयक्तिक) | दूरध्वनी<br>२२६२१०३१-३६<br>२२६२१००६ | Website : http://maha-arogya.gov.in<br>Email : cpsdhs@gmail.com<br>Fax No. 022-22621034 / 22620234 (DHS) |
|---|---|---|

| **नोंदणी आदेश** | क्र.संआसे/सीपीएस पदविका २०१९ तिसरे सत्र/ न.क्र.८५/ ११९८/११९० /१९<br>दिनांक - २९/११/२०१९ |
|---|---|

**विषयः- डिएचएस सीपीएस -२०१९**
**महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिका-यांना सेवांतर्गत सीपीएस पदविका अभ्यासक्रम सत्र-२०१९ करिता नोंदणी देणेबाबत.**

डिएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रम प्रवेश २०१९ च्या रिक्त पदांसाठी नीट २०१९ पात्रता निकष कमी करुन सेवांतर्गत वैद्यकीय अधिका-यांकडून व खाजगी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. आरोग्य सेवा, संचालनालयाने पात्र वैद्यकीय अधिका-यांना नियमानुसार अनुज्ञेय असलेले सेवेबाबतचे गुणाधिक्य देऊन अंतिम गुणवत्ता यादी नुसार प्रवेश प्रक्रिया घेऊन प्रतिनियुक्ती देण्यात आलेली आहे. सोबत जोडलेल्या प्रपत्रांमध्ये डिएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमाकरीता निवड झालेल्या वैदयकीय अधिका-यांची विषयनिहाय व रुग्णालयनिहाय यादी जोडली आहे.

१) डिएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमाकरिता निवड झालेल्या सेवांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आल्यानंतर व डीएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ते शासनाची किमान २ वर्षे सेवा करतील असे बंधपत्र (हमीपत्र) अभ्यासक्रमासाठी रुजू होण्यापूर्वी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे विहीत मार्गाने भरुन देणे बंधनकारक राहील. बंधपत्रातील ही अट न पाळल्यास नोंदणी धारकांना रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त) एवढी बंधपत्राची रक्कम संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडे जमा करावी लागेल.

२) पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर पदस्थापनेबाबतची कार्यवाही शासनस्तरावरुन करण्यात येईल. संबंधित उमेदवारांना विशिष्ट ठिकाणी नियुक्ती देण्याची मागणी करता येणार नाही. शासन अशा उमेदवारांना ज्या ठिकाणी नियुक्ती देईल त्याठिकाणी काम करावे लागेल.

३) डिएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सेवा जेवढया कालावधीनंतर सोडणार त्या प्रमाणात बंधपत्राची रक्कम वसूल करण्यात येईल. या संबंधी शासनाचा निर्णय संबंधित वैद्यकीय अधिका-यांवर बंधनकारक राहील.

४) डिएचएस सीपीएस पदविका नोंदणी देऊन प्रतिनियुक्ती दिलेल्या वैद्यकीय अधिका-याने अभ्यासक्रमाकरिता रुजू होउन अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास / अभ्यासक्रम मध्येच सोडून दिल्यास प्रतिनियुक्ती कालावधीत त्यांना देण्यात आलेले वेतन व भत्ते त्यांच्याकडून वसूल करण्यात येतील. तसेच परत नोंदणीसाठी विचार केला जाणार नाही व कोणत्याही कारणास्तव निवड केलेली जागा अभ्यासक्रम पुर्ण न करता वाया घालविल्यास (Seat Lapse) संबंधित उमेदवाराला दंड म्हणून रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लक्ष फक्त) एवढी रक्कम शासनाकडे जमा करावी लागेल.

५) डिएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमाकरिता निवड झालेल्या वैद्यकीय अधिका-यांची माहिती आरोग्य सेवा संचालनालयाकडून दिली जाईल. त्याचप्रमाणे डिएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमाकरिता प्रतिनियुक्ती आदेश प्राप्त होताच संबंधित अधिका-यांने त्यांना नोंदणी दिलेल्या रुग्णालयात दिलेल्या विषयांत नोंदणी प्राप्त करुन घेण्याकरिता जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक यांच्याकडे अर्ज करुन ती वेळेत घेणे आवश्यक राहील.

६) सेवांतर्गत डीएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमाकरिता निवड झालेल्या वैद्यकीय अधिका-यांना या आदेशान्वये संचालनालय स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यात येत आहे. **सेवांतर्गत वैदयकीय अधिका-यांनी आरोग्य सेवा संचालनालय (डिएचएस सीपीएस) कार्यालयातील औपचारिकता पूर्ण केल्यानंतर प्रथम संबंधित रुग्णालयात दि.०३/१२/२०१९ पर्यंत रुजू व्हावे व त्यानंतर मूळ पदावरुन कार्यमुक्त व्हावे.** उमेदवाराने नोंदणी न घेतल्यास ती नोंदणी आपोआप रद्द होईल व उमेदवाराकडून प्रचलित नियमांनुसार दंड आकारण्यात येईल व पुढील डिएचएस सीपीएस कोर्ससाठी २ वर्षासाठी बाद ठरविण्यात येईल. तसेच संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीमध्ये त्यांची आस्थापना संचालनालय स्तरावरुन हाताळली जाणार आहे.

७) अभ्यासक्रमाच्या कालावधीत शक्यतो रजेवर जाऊ नये तसेच रजेची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे रजा घेतल्यास त्याची माहिती संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक यांच्यामार्फत संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना तात्काळ कळवावे.

८) डिएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमाकरिता निवड झालेल्या वैद्यकीय अधिका-यांना निवासाची सोय उपलब्धतेनुसार जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक यांच्याकडून केली जाईल. अभ्यासक्रमाचा अवधी पूर्ण होताच निवासस्थान रिक्त करावे लागेल.

९) ज्या वैदयकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या विनंतीनुसार अभ्यासक्रमाच्या ठिकाणी शासकीय निवासस्थान उपलब्ध झाले असेल त्यांनी याबाबत तात्काळ आयुक्त, आरोग्य सेवा संचालनालय मुंबई यांना अवगत करावे. तसेच पुर्वीच्या पदस्थापनेच्या ठिकाणचे निवासस्थान सोडल्याचे प्रमाणपत्र संचालनालयास सादर करणे आवश्यक आहे

१०) प्रतिनियुक्तीचा कालावधी ही तात्पुरती बदली समजण्यात येऊन मुंबई नागरी सेवा नियम ३३९ व ३४४ मध्ये विहित केल्याप्रमाणे तसेच मुंबई नागरी सेवा नियम खंड (२) मधील परिशिष्ठ १५ मध्ये विहित करण्यात आलेल्या सर्वसाधारण नियमाच्या अधिन राहून घरभाडे भत्ता देय राहील.

११) सेवांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता निवड झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना या आदेशान्वये संचालनालय स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यात येत आहे.

१२) डिएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्तीवर असलेल्या वैद्यकीय अधिका-यांचे वेतन व भत्ते संचालक, आरोग्य सेवा, मुंबई येथून काढण्यात येतील.

१३) शासन निर्णय क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.६२६/११/सेवा-३/मंत्रालय, मुंबई दि.०७/०८/२०१२ अन्वये ज्या सेवांतर्गत वैद्यकीय अधिका-यांना उच्च शिक्षणासाठी प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येईल अशा वैद्यकीय अधिका-यांना प्रशिक्षण कालावधी दरम्यान व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

१४) सेवांतर्गत वैदयकीय अधिका-यांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ते संचालक, आरोग्य सेवा, मुंबई येथे हजर होतील व त्यांनी आपला रुजू अहवाल संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडे सादर करावेत व पुढील पदस्थापनेकरीता त्यांनी त्यांचा विकल्प संचालनालयास सादर करावा.

डिएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रम सुरळीत व सुकर पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून तसेच गरज भागविण्याच्या दृष्टीने संबंधित वैद्यकीय अधिका-यांना पूर्ण वेळ विषयाच्या विभागात काम करणे आवश्यक असल्यामुळे त्यांना प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्यात येत आहे. सदर नियुक्तीमुळे वैद्यकीय अधिकारी प्रतिनियुक्तीच्या कालावधीत रजिस्ट्रारप्रमाणे सर्व सवलतीस पात्र राहतील.

२९/११/१९

**संचालक**
**आरोग्य सेवा, मुंबई.**

**प्रतः- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (संबंधित जिल्हा)
२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, (संबंधित जिल्हा)
३) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (संबंधित जिल्हा)
४) उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे (सर्व)
५) वैद्यकीय अधिक्षक, स्त्री रुग्णालय/ उपजिल्हा रुग्णालय (संबंधित जिल्हा)
६) जिल्हा कोषागार अधिकारी, (संबंधित जिल्हा).
७) महालेखाकार महाराष्ट्र राज्य मुंबई / नागपूर.
८) अध्यक्ष, कॉलेज ऑफ फिजीशियन ॲन्ड सर्जन्स, परेल, मुंबई.

**प्रत सविनय सादर :-**
मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग (सेवा-३) मंत्रालय, मुंबई.

## डिएचएस सीपीएस पदव्युत्तर पदविका -२०१९ अभ्यासक्रमासाठी नोंदणी दिलेल्या सेवांतर्गत उमेदवारांची यादी

| Sr. No. | Candidate Name | Main category | Claimed quota | Selected Institute | Subject | Selected Category | Selected Quota |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PRASHANT BABURAO SAHARE | SC | IN-SERVICE | Daga Memorial Govt. Women Hospital, Nagpur | DGO | SC | IN-SERVICE |
| 2 | KANCHAN PRAMOD BADEWALE | OPEN | IN-SERVICE | District Hospital Alibagh Raigad | DCH | OPEN | IN-SERVICE |
| 3 | UTTAM HUSAN CHAUDHARI | SC | IN-SERVICE | Daga Memorial Govt. Women Hospital, Nagpur | DOMS | SEBC | IN-SERVICE |
| 4 | ANIL SAHEBRAO BIRHADE | SC | IN-SERVICE | District Hospital, Aundh Camp, Pune | D'ORTHO | SEBC | IN-SERVICE |
| 5 | ARJUN GOVIND DIGHE | ST | IN-SERVICE | Civil Hospital, Ahmednagar | DCH | OBC | IN-SERVICE |
| 6 | VISHAL ONKARDAS WAGHMARE | SC | IN-SERVICE | District Hospital Bhandara | DGO | OPEN | IN-SERVICE |
| 7 | YUVRAJ ARVIND DADHALE | SEBC | IN-SERVICE | District Women Hospital, Latur | DGO | OPEN | IN-SERVICE |
| 8 | DATTA BALAJI PINATE | OPEN | IN-SERVICE | District Hospital, Aundh Camp, Pune | DA | OBC | IN-SERVICE |
| 9 | DNYANESHWAR SANGRAM GAIKWAD | SEBC | IN-SERVICE | District Hospital Parbhani | DTMH | SEBC | IN-SERVICE |
| 10 | AMIT RAMAKANTRAO BANSHELKIKAR | OPEN | IN-SERVICE | Civil Hospital, Ahmednagar | D'ORTHO | OPEN | IN-SERVICE |
| 11 | NITESH REKCHAND WANKAR | SC | IN-SERVICE | Daga Memorial Govt. Women Hospital, Nagpur | DA | OBC | IN-SERVICE |
| 12 | SHILPA DHARMAPAL DONGARE | SC | IN-SERVICE | District Hospital For Women Amravati (Dafrin) | DCH | ST | IN-SERVICE |
| 13 | ASAD FAHEEM MOHD. FAIZULLAH | OPEN | IN-SERVICE | District Women Hospital, Akola | DCH | NT-1 | IN-SERVICE |
| 14 | HEMANT RAJARAM BHILAVEKAR | ST | IN-SERVICE | District Hospital, Aundh Camp, Pune | DOMS | ST | IN-SERVICE |
| 15 | PRAKASH RAMRAO HIMGIRE | SC | IN-SERVICE | Sub District Hospital Dahanu, Palghar | DCH | OBC | IN-SERVICE |
| 16 | SANJU BABU THAKARE | ST | IN-SERVICE | District Women Hospital Jalna | DGO | NT-1 | IN-SERVICE |
| 17 | RAVINDRA SHANKAR RATHOD | VJ DT -A | IN-SERVICE | District Hospital, Beed | DCH | VJ DT A | IN-SERVICE |
| 18 | VISHWANATH KERBA DASRE | OPEN | IN-SERVICE | District Civil Hospital Gadchiroli | DGO | SEBC | IN-SERVICE |
| 19 | EKNATH DNYANESHWAR NAVSAGAR | OBC | IN-SERVICE | District Hospital Parbhani | D'ORTHO | ST | IN-SERVICE |
| 20 | SURAJKUMAR BABAN WAKODE | SC | IN-SERVICE | District Hospital, Beed | DGO | SC | IN-SERVICE |
| 21 | ARAIL MADHUKAR MALOKAR | OBC | IN-SERVICE | District Hospital, Wardha | DCH | OBC | IN-SERVICE |
| 22 | BHUSHAN BHAGAYAN BADHEKAR | SEBC | IN-SERVICE | District Hospital, Aundh Camp, Pune | DCH | SEBC | IN-SERVICE |
| 23 | SONALI PANDURANG BANSOD | SC | IN-SERVICE | Daga Memorial Govt. Women Hospital, Nagpur | DA | OPEN | IN-SERVICE |
| 24 | DNYANESHWAR VIKRAM CHAVAN | DT (VJ) | IN-SERVICE | District Hospital, Beed | DA | NT2 | IN-SERVICE |
| 25 | KULDIP PRABHAKAR AMBHORE | SC | IN-SERVICE | District Women Hospital, Akola | DCH | SC | IN-SERVICE |
| 26 | SAMEER AHMED PATEL | OPEN | IN-SERVICE | District Women Hospital Jalna | DCH | OPEN | IN-SERVICE |
| 27 | SACHIN SAHEBRAO BHALERAO | SC | IN-SERVICE | Sub District Hospital, Gadhingalaj Dist. Kolhapur | DCH | SC | IN-SERVICE |
| 28 | SHIKHARE CHETAN ALAIS LAKHAN JANGONDA | OPEN | IN-SERVICE | Sub District Hospital, Gadhingalaj Dist. Kolhapur | DGO | SEBC | IN-SERVICE |
| 29 | SURYAKANT SHIVDAS DEVDE | SEBC | IN-SERVICE | District Hospital, Aundh Camp, Pune | DA | OPEN | IN-SERVICE |
| 30 | SANJAY VENKATRAO TEKALE | SEBC | IN-SERVICE | District Women Hospital, Latur | DA | SC | IN-SERVICE |
| 31 | VIJAY TUKARAM MANORE | SC | IN-SERVICE | District Hospital Nashik | D'ORTHO | SC | IN-SERVICE |
| 32 | SUNANDA SHRIRAM KATHAR | OPEN | IN-SERVICE | Sub District Hospital, Gadhingalaj Dist. Kolhapur | DGO | ST | IN-SERVICE |
| 33 | SACHIN SURESH CHAPPALWAR | ST | IN-SERVICE | District Hospital, Aundh Camp, Pune | D'ORTHO | SEBC | PRIVATE |
| 34 | SHAIKH MOHSIN AHMAD ABDUL SATTAR | OPEN | IN-SERVICE | District Hospital, Aundh Camp, Pune | DCH | SEBC | PRIVATE |
| 35 | DINESH RAMBHAU JADHAV | OPEN | IN-SERVICE | District Women Hospital Jalna | DGO | NT-1 | PRIVATE |
| 36 | SANDESH NARESH AGALE | SC | IN-SERVICE | District Hospital Nashik | DA | OPEN | PRIVATE |
| 37 | RIZWANODDIN MISBAHODDIN KAZI | OPEN | IN-SERVICE | District Hospital Parbhani | D'ORTHO | ST | PRIVATE |
| 38 | QUAZI JUWERIA NAZNEEN RAZIUDDIN | OPEN | IN-SERVICE | District Hospital Parbhani | DTMH | SEBC | PRIVATE |

29/11/19

संचालक
आरोग्य सेवा, मुंबई.